झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
Email : info@sra.gov.in

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई अभियांत्रिकी विभाग
परिपत्रक क्र. १३९
दिनांक 15 . . 2012
झो.पु.प्रा./अभि./कार्यासन- /..........

झोपुप्रा / मु.का.अ./परिपत्रक/परि-२/वा.नि/339 /२०१२
दिनांक : 18 SEP 2012

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारक मयत झाल्यास त्यांचे कायदेशीर वारसांचे पात्रतेबाबत व संस्थेतील सभासदत्वाबाबत.

उपरोक्त विषयावरील प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.९४ दिनांक ६ एप्रिल, २००९ च्या परिच्छेद १ मध्ये परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीत सदनिका/गाळयांचे वाटप करताना संबधित झोपडीधारकाचे वारसाबाबत सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून त्यावारसाचे नाव परिशिष्ट-२ मध्ये मयत झोपडीधारकाचे ऐवजी समाविष्ट करावे अशी तरतूद आहे.

परंतू वारसप्रमाणपत्र (Succession Certificate) हे मयताच्या केवळ जंगम मालमत्तेबाबत दिले जात असल्यामुळे सदरील परिपत्रकात दुरुस्ती करणे आवश्यक झाले आहे.

सबब वरील परिपत्रकातील परिच्छेद १ मध्ये "सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र" या ऐवजी "मयत झोपडी धारकाचे अर्जदार-वारसाकडून हमीपत्र आणि शपथपत्र व इतर वारसांकडून आणि सबंधीत गृहनिर्माण संस्थेकडून ना हरकत प्रमाणपत्रे अशी सर्व मूळ कागदपत्रे घेवून त्या वारसाचे नांव परिशिष्ट-२ मध्ये मयत झोपडीधारकाचे ऐवजी समाविष्ट करावे, अथवा वारसा हक्काबाबत जर काही वाद असेल तर अशा प्रकरणी मृत्यूपत्र खरे असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा दाखला (Probate) किंवा Letter of Administration with or without Will यापैकी संबधित प्रकरणी जे लागू असेल ते मूळ कागदपत्र घेवून त्या वारसाचे नाव परिशिष्ट -२ मध्ये मयत झोपडीधारकाचे ऐवजी समाविष्ट करावे" असा बदल करण्यात येत आहे.

हा बदल तात्काळ अमलात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

S.E. Shri Patil
Please Discuss.
Please Process and Put up immediately
Pl enclosed to file and put up
(कृपया मागे पहा)
A.E. (SRA)-XI